॥ ॐ ॥

# ‘स्व’-रूपवर्धिनी कार्यवृत्त

डिसेंबर २०२०

२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११ ०११.

(कार्यालय दूरध्वनी) : २६१२१७०४ भ्रमणध्वनी : ९०११३८६३८६

Email : wardhinee@gmail.com

Website : http://www.swaroopwardhinee.org

## कै. कृष्णाजी लक्ष्मण पटवर्धन

## जन्मशताब्दी वर्ष

१९२०-२०२०



**संस्थापक - ‘स्व’-रूपवर्धिनी**

जन्मतिथी : दत्तजयंती, जन्म दिनांक : २५ डिसेंबर, १९२०

वर्धक/वर्धिका कार्यकर्त्यांनो,
‘मैं नहीं तू ही ।’ हे संघानी मला शिकवलं,
खरंच सांगतो, माझ्या परीनं मी ते जपलं.
आपलं काम वाढवायचं असेल,
समाजाचा विश्वास टिकवायचा असेल,
तर बघा हे सूत्र वापरून,
घ्या स्वतःच त्याची खात्री करून,
‘नव्या कल्पना, नवे उपक्रम
भरपूर काम अन् व्यस्त दिनक्रम’
असा मी जगलो, तुम्हीही तसं जगा
अशा जगण्यात काय मजा असते
अनुभवून तर बघा.
ही सारी धडपड आहे
समृद्ध, समर्थ भारतासाठी
मी ही आसुसलेला आहे ते सारं पाहण्यासाठी
या धडपडीला सर्वांची साथ असायलाच हवी
भारतमाता जगद्गुरूच्या स्थानी
बसायलाच हवी !

## समुपदेशन विभाग



**या विभागाकडून खालील उपक्रम झाले -**

१) दि. ९ नोव्हें. - सौ. साधनाताई सेठिया यांचे 'बहर जोपासताना' या विषयावर वयात येणाऱ्या मुलांच्या पालकांसाठी व्याख्यान झाले. त्यातील काही विशेष मुद्दे -

* कुटुंब व्यवस्था उत्तम असली की मुलांची जडणघडण चांगली होते. त्यामुळे घरातील नकारात्मक गोष्टी मुलांपर्यंत पोहोचू नयेत याची आपण काळजी घेतली पाहिजे.

* सध्या कोरोनामुळे भ्रमणध्वनी, आंतरजाल (इंटरनेट) याची अनिवार्य आवश्यकता भासत आहे. तरी पण आपला पाल्य याचा योग्य वापर करत आहे ना याकडे आपण लक्ष दिले पाहिजे.

* प्रत्येक मूल हे वेगळं असते. त्यामुळे मुलांची आणि त्याच्या मित्रांची तुलना करू नका. सहकारी मित्रांचा दबाव मुलांवर टाकू नका.

* सध्याच्या बदलत्या परिस्थितीनुसार मुलांच्यातील बदल समजून घेऊन त्याप्रमाणे त्यांना घडवण्याचा प्रयत्न करा.

* संवादाचा सेतू हा कोणत्याही नात्याचा पाया असतो. म्हणून मुलांशी आपले नाते सुदृढ होण्यासाठी संवाद करा.

* किशोरवयातील मुलांना निरपेक्ष प्रेम करणारे हवे असतात. त्यांच्या चांगल्या गोष्टींवर खुली दाद द्या.

२) इंग्रजी संभाषण कौशल्य कार्यशाळा - दि. २ ते ७ नोव्हें. रामकृष्ण शाखेतील युवकांची ही कार्यशाळा झाली. आपले संभाषण प्रभावी व्हावे म्हणून स्पष्टता, अचूकता, अर्थपूर्णता, कमीतकमी पण योग्य शब्दात विषय मांडणी, श्रोत्यांची मानसिकता लक्षात घेणे या गोष्टी लक्षात ठेवाव्या यावर चर्चा झाली.




३) कल चाचणी (Aptitude Test) - दि. ५ डिसेंबरला सर्व शाखांमधील १० वी उत्तीर्ण झालेल्या ३७ वर्धक-वर्धिकांची कल चाचणी झाली. चाचणीनंतर श्यामची आई फाऊंडेशनच्या संचालिका श्रीमती शीतलताई बापट यांनी मुलांशी संवाद साधला. मुलांनी जीवनक्रमाबद्दल (करिअरबद्दल) विचारलेल्या प्रश्नांना ताईंनी समर्पक उत्तरे दिली.

४) पालकसभा - दि. ९ डिसेंबरला स्वामी दयानंद सरस्वती शाखेच्या पालकांची पालकसभा झाली. कोरोनामुळे मुलं व पालक घरी असल्याने, मुलांची शाळा संगणकाच्या माध्यमातून सुरू असल्याने भ्रमणध्वनीचा (मोबाईल) वापर वाढला. त्यामुळे पालक व मुलांची चिडचिड वाढली आहे. अशा परिस्थितीत पालकांनी मुलांशी संवाद कसा केला पाहिजे, मुलांची प्रगती अडू नये म्हणून कसे प्रोत्साहित केले पाहिजे इ. बद्दलचे मार्गदर्शन सौ. मेघा नगरे यांनी केले.

**आणि मार्ग सापडला...**

शाखेतल्या एका युवतीचे इंजिनियरिंगच्या दुसऱ्या वर्षाला २ विषय राहिले आणि त्यामुळे तिला शिक्षणाची दिशा बदलावी असे वाटू लागले. घरात अनुकूल परिस्थिती असल्याने तिने हा विचार सोडावा, राहिलेल्या २ विषयांचा अभ्यास वेगवेगळ्या पद्धतीने करावा यासाठी तिला मार्गदर्शन व समुपदेशन केले आणि आता ती पार्टटाईम काम करून इंजिनियरिंगच्या शेवटच्या वर्षाचे शिक्षण घेत आहे. समुपदेशनामुळे तिचा आत्मविश्वास वाढला आणि तिने अध्ययनाच्या (करिअर) दिशेने वाटचाल सुरू केली.



## पाकोळी बालवाडी

नोव्हेंबर महिन्यात अभिनय गीत, कोलाज काम, प्राण्यांचा मराठी व इंग्रजीतून परिचय, पाळीव प्राणी, जंगली प्राणी, A to Z ही अक्षरे, रेषांचा अभ्यास, बडबड गीते इ. विषयावर शिक्षिकांनी चित्रफिती (व्हिडिओ) करून पालक गटावर पाठवले. याला प्रतिसाद म्हणून पालकांनी मुलांच्या चित्रफिती (व्हिडिओ) करून पाठवल्या. यात सोहाने माशाच्या चित्रावर कोलाज काम केले तर उर्मिला, भार्गवीनी एक व अनेक ही संकल्पना वस्तूंमधून दाखवली, श्रेयस सकटने A to Z आद्याक्षरे म्हटली. दिवाळीसाठी आकाशकंदील बनवण्याचे व्हिडिओ गटावर पाठवले. रांगोळीत रंग भरणे, आकाशकंदील करणे, वसुबारसेला गाईची पूजा करणे अशी मुलांची छायाचित्रे (फोटो) पालकांनी गटावर पाठवली. घरोघरी तुळशी विवाहाच्या कार्यक्रमात मुलांनी उत्साहाने भाग घेतला. पालकांच्या व मुलांच्या प्रतिसादाने शिक्षिकांचा उत्साह वाढत आहे.

## महिला विभाग - रुग्ण सहाय्यक वर्ग



दि. ६ नोव्हेंबरला श्री. सुनिल कुलकर्णी सरांनी (PPT) दृकश्राव्य माध्यमातून (गुगल मीटद्वारे) Covid-19 ची सविस्तर माहिती सांगितली. रोग प्रसार करणारे जिवाणू, विषाणू यातील फरक, त्यामुळे होणारे रोग (Co-कोरोना, vi-व्हायरस, d- डिसीझ, 19 - वर्ष) याप्रमाणे Covid-19 शब्दाचा अर्थ, Covid ची लक्षणे, त्याचा शरीरात प्रवेश झाल्यावर तो कसा कार्यरत होतो, तो रोग होऊ नये म्हणून घेण्याची खबरदारी याबद्दलची माहिती सर्वांना मिळाली.

दि. २ डिसेंबरला 'जागतिक एड्स दिना'निमित्त के. ई. एम. हॉस्पिटल नर्सिंग कॉलेजच्या प्राचार्या नेहाताई दिवे यांचे दृकश्राव्य माध्यमातून (गुगल मीटद्वारे) व्याख्यान झाले. त्यांनी खूप सोप्या भाषेत सर्व शास्त्रीय माहिती सांगितली. सध्याच्या संशोधनानुसार मधुमेहाप्रमाणे HIV रोगातही Type 1 व Type 2 असे प्रकार आहेत व त्यातील फरक हे सर्वांना नव्यानेच माहीत झाले. दि. १० डिसेंबरला वर्गाची पहिली पालकसभा झाली. सर्व पालक उपस्थित



होते. त्यांना 'स्व'-रूपवर्धिनीची माहिती तसेच वर्गाचे नियम, आणि दि. ७ व ८ डिसेंबरला झालेल्या चाचणी परीक्षेचा निकाल सांगितला. पालकांच्या शंकांचे निरसन शिक्षकांनी केले. तसेच यापुढील वर्गाच्या अन्य उपक्रमांसाठी दवाखान्यातील प्रत्यक्ष कामासाठी (प्रॅक्टिकलसाठी) सहकार्य करू, पाल्यांना प्रोत्साहन देऊ असे पालकांनी सांगितले.





## बचतगट - जागर स्त्री शक्तीचा, बचतगटातील व्यवसायाचा



दि. ३१ ऑक्टोबरला बचतगटातील व्यावसायिक महिलांचे (गुगल मीटद्वारा) एकत्रीकरण झाले. यात महिला विभागाच्या ३५ कार्यकर्त्या सहभागी झाल्या.

सुरुवातीला धनलक्ष्मी स्वयंसहायता समूहाच्या सुजाता कुदळे, सुरेखा माळी, मीरा शिंदे व रत्नमाला पेडणेकर यांनी सुरू केलेल्या 'सुरूची फुड' व्यवसायाची माहिती सांगितली. १६ वर्षांपूर्वी 'स्व'-रूपवर्धिनीत प्रकल्पासाठी या महिला एकत्र आल्या. बचतगटाच्या साहाय्याने काही छोटे छोटे व्यवसायही त्यांनी अनुभवले आणि कोरोना काळात नोकरी गेल्याने परत व्यवसायास त्यांनी सुरुवात केली. घरगुती पिठाची गिरणी घेऊन तयार पिठे विकायचा व्यवसायास सप्टेंबर २०२० पासून सुरुवात झाली. दिवाळीच्या दिवसात त्यांनी फराळाचे पदार्थ करून विक्री केली. मार्केट यार्डमध्ये फिरून कच्चा माल आणणे, व्यापाऱ्यांशी ओळख करून घेणे, माल तयार करून मागणीप्रमाणे पोहोचवणे, जाहिरात करणे या सगळ्या आवश्यक गोष्टी चौघीजणी मिळून करतात. विशेष म्हणजे ह्या धंद्यासाठी लागणारे भांडवल त्यांच्या मुलींनी उभे केले. आईच्या ह्या नव्या धडपडीला मजबूत हातांची साथ मिळाली. त्यांच्या या मनोगतातून आपणही अशी धडपड करू शकतो असा आत्मविश्वास दुणावला.

यानंतर सुनिता नरवणे, मधुमती कुपस्थ, यास्मिन शेख, शकिला शेख, अनिता ढमाले, संगीता गायकवाड, कल्पना पंडित या महिलांनी त्यांच्या व्यवसायाची माहिती सांगितली. समारोप करताना बागेश्रीताई पोंक्षे म्हणाल्या, "'सुरूची फुड' यातील महिलांनी व इतरांनीही उराशी बाळगलेले स्वप्न प्रत्यक्षात उतरवले आहे. त्याबद्दल सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन. खरं तर महिलांनी एकत्र येऊन स्वत:च्या पायावर उभे राहणे खूप अवघड आहे. पण संधी एकदाच दिसते त्याचा त्यांनी लाभ घेतला आणि समाजातील गरजांचा विचार करून व्यवसाय सुरू केला. यातून आपण सर्वांनी प्रेरणा घेऊन पुढे जाऊयात. आपल्या व्यवसायावर आपल्या मुलाप्रमाणे प्रेम करा. कारण तो तुम्ही निर्माण केला आहात. व्यवसायातून पैसा मिळतो, तयार होतो तो तुमच्यासाठी तसेच राष्ट्रासाठीही उपयोगी असतो. हा बदलाचा गोवर्धन परिचयातील, समविचारी महिलांच्या साथीने उचलूयात."

## शाखा विभाग

दिवाळीनिमित्त सर्व शाखांवर ७ नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबर या कालावधीत 'किल्ले बनवा' स्पर्धा संपन्न झाली. मुलांनी माती, दगड याशिवाय कागद आणि इतर वस्तू वापरून सुरेख किल्ले बनवले. किल्ल्याची माहिती पत्रक (पोस्टर) व चित्रफीत (व्हिडिओ) रूपात सादर केली.

**समर्थ रामकृष्ण शाखा -**

दिवाळीनंतर वर्धिनीमध्ये दररोज इयत्ताशः शाखा भरत आहे. शाखेत व्यायाम, खेळ, मल्लखांब प्रशिक्षण व अभ्यास चालू आहे.

**स्वामी दयानंद सरस्वती शाखा -**

दिवाळीत युवकांनी बिबवेवाडीतील राजगड कार्यालयात राजगड किल्ल्याची प्रतिकृती तयार केली होती. दि. १८ नोव्हेंबरला चिंतामणी नगर परिसरातील नागरिकांनी व पालकांनी या किल्ले प्रदर्शनास भेट दिली. दि. ५ ते ९ नोव्हेंबर या कालावधीत दहावीच्या विद्यार्थ्यांची परीक्षा झाली आणि १७ नोव्हेंबरपासून इ. ८ वी ते १० वीच्या मुलांचे आठवड्यातून दोन दिवस अभ्यासाचे तास सुरू झाले आहेत.

**धर्मवीर शंभूराजे शाखा -**





दि. ११ डिसेंबरला शाखेचा वर्धापन दिन सायकलवारी करून साजरा करण्यात आला. धनकवडी ते खडकवासला या मार्गाने २२ जणांनी ३५ किलोमीटरचा सायकल प्रवास पद्य, गप्पा गोष्टी 'वर्धापनदिनाचे महत्त्व आणि शाखेतील माझी भूमिका' या विषयावर चर्चासत्र घेऊन साजरा झाला.



शाखेचा इयत्ता १० वी चा वर्धक सोमेश राठोड हा अतिशय हुशार, मेहनती आणि अभ्यासू आहे. पण कोरोना पार्श्वभूमीवर त्याचा संपर्क तुटला. १० वीत असल्यामुळे अभ्यास नियोजन, ऑनलाईन तास (संगणकाच्या माध्यमातून) याबाबत त्याचे



**प्रगती पालक श्री. तुषार कापडे** यांना चिंता वाटत होती आणि अचानक त्यानेच कापडे सरांना स्वतःहून संपर्क केला. गेले काही दिवस तो स्वतःच्या गावी हैद्राबादला होता. गावी गेलेला सोमेश पुण्यात आला आहे हे कळताच तुषार सरांनी क्षणाचाही विलंब न लावता त्याची भेट घेतली आणि त्यामुळे त्याचा पुढील अभ्यास जोमात सुरू झाला आहे.

**क्रांतीज्योती सावित्री शाखा -**





डिसेंबर महिन्यात साप्ताहिक शाखा पर्वतीवर घेण्यात आली. खूप दिवसांनी युवती आणि वर्धिका यांची भेट झाली. त्यामुळे शाखेत उत्साहाचे वातावरण होते.

## युवा विभाग

३० नोव्हेंबरला सायकल सहलीचे आयोजन करण्यात आले. पद्मावती ते कात्रज घाट या मार्गाने ही सहल संपन्न झाली. सहलीत ३० युवक आणि ३ युवतींनी सहभाग घेतला. या सहलीत तुषार मुढे याने प्रथम, मंदार सोनावळे याने द्वितीय आणि यश गाडे



याने तृतीय क्रमांक मिळवला. तुषार मुढे याला 'घाटाचा राजा' आणि रितिका आनंदास हिने 'घाटाची राणी' असे बक्षीस पटकावले.



